# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक ३८०-२२** **दिनांक ०९/१२/२०२२**

## १० वी राष्ट्रीय स्तरीय वसई-विरार महानगरपालिका मॅरेथॉन अनुषंगाने वाहतूक कोंडी होऊन स्पर्धकांना अडथळा निर्माण होवू नये याकरिता पोलीस उप-आयुक्तांची वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी.

दिनांक ११/१२/२०२२ रोजी १० वी राष्ट्रीय स्तरीय वसई-विरार महानगरपालिका मॅरेथॉन स्पर्धा व इतर शालेय स्पर्धांचे आयोजन वसई-विरार महानगरपालिका व तालुका कला क्रिडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावर नवीन विवा कॉलेज, विरार (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आले आहे. पुर्ण मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन नवीन विवा कॉलेज विरार (पश्चिम) येथे, अर्ध मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन व्हिक्टर हाईटस बिल्डिंग, वसई (पश्चिम) येथे व ११ कि.मी. मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन नवीन विवा कॉलेज, विरार (पश्चिम)येथे करण्यात आले आहे. नमूद तिनही स्पर्धांचा व इतर स्पर्धांचा फिनिश पॉईट नवीन विवा कॉलेज येथे असणार आहे.

सदर मॅरेथॉन स्पर्धेच्या वेळी सकाळी ०५.३० वा ते दुपारी ०१.०० वा. च्या दरम्यान शहरातील वाहनांमुळे वाहतुक कोंडी होवून स्पर्धकांना अडथळा निर्माण होण्याची तसेच मॅरेथॉन मध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांचा अपघात होण्याची शक्यता आहे.

त्याकरीता श्री प्रकाश गायकवाड, पोलीस उपायुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चेकलम ३३ (१)(ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ)(ब) अन्वये पुढील प्रमाणे अधिसूचना जारी केली आहे.

### मॅरेथॉन रुट

**<u>१) पूर्ण मॅरेथॉन (४२.१९५ कि.मी.)</u>**

पूर्ण मॅरेथॉन (४२.१९५ कि.मी.) स्पर्धा ही नवीन विवा कॉलेज येथून सुरू होवून तिरूपतीनगर- जकात नाका- म्हाडा रोड वरील नवीन मनपा चौक येथून यु टर्न-जकात नाका- बोळींत नाका- पाटील आळी- उमराळे चर्च-चक्रेश्वर तलाव-हेडगेवार चौक- समेळ पाडा- नालासोपारा रेल्वे ब्रीजवरून पूर्वकडे- आचोळे रोड- बँक ऑफ इंडीया-वसंतनगरी ग्राउंड- वसंत नगरी सर्कल-वसई स्टेशन रोड- वसई ओव्हर ब्रीजवरून पश्चिमेकडे- डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक (पंचवटी नाका)- अंबाडी रोड- माणिकपूर नाका- वसई माणिकपूर रोड- बाभोळा नाका- पापडी नाका- तामतलाव नाका- चिमाजी आप्पा मैदान-जी.जी.कॉलेज- व्हिक्टर हाईटस्- पंचायत समिती रोड- पारनाका- बस डेपो मार्गे- चिमाजी आप्पा मैदान- तामतलाव नाका- पापडी नाका- बाभोळा नाका- माणिकपूर नाका- अंबाडी रोड- डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक (पंचवटी नाका)- वसई ओव्हर ब्रीजवरून पूर्वेकडे- वसंतनगरी मेनगेट-वसंत नगरी सर्कल- वसंत नगरी ग्राउंड- फायर ब्रीगेड स्टेशन- बँक ऑफ इंडीया- आचोळे रोड (पूर्व)- नालासोपारा रेल्वे ब्रीजवरून पश्चिमेकडे- समेळ पाडा- हेडगेवार चौक- चक्रेश्वर तलाव- उमराळे चर्च- पाटील आळी- बोळींज नाका- गोकुळ टाऊनशीप-मुलजीभाई मेहता स्कूल-राजीव चौकातुन उजवीकडे- विजय वल्लभ हॉस्पीटल-तिरूपती नगर- नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

**<u>२) अर्ध मॅरेथॉन (२१ कि.मी.) -</u>**

अर्ध मॅरेथॉन (२१ कि.मी.) स्पर्धा हा रूट व्हिक्टर हाईटस् परिसर- पंचायत समिती रोड-पारनाका- वसई बस डेपो मार्गे- तामतलाव नाका- पापडी नाका- वसई स्टेशन रोड- बाभोळा नाका- वसई माणिकपूर रोड- माणिकपूर नाका- नवघर अंबाडी रोड पोलीस चौकी-अंबाडी रोड- डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक (पंचवटी नाका)- वसई ओव्हर ब्रीजवरून

पूर्वेकडे- वसंत नगरी मेनगेट- वसंत नगरी सर्कल- वसंत नगरी ग्राउंड- फायर ब्रीगेड स्टेशन- बँक ऑफ इंडीया- आचोळे रोड (पूर्व)- नालासोपारा रेल्वे ब्रीजवरून पश्चिमेकडे- समेळ पाडा- हेडगेवार चौक- चक्रेश्वर तलाव- उमराळे चर्च- पाटील आळी- बोळींज नाका- गोकुळ टाऊनशीप-मुलजीभाई मेहता स्कूल-राजीव चौकातुन उजवीकडे- विजय वल्लभ हॉस्पीटल-तिरूपती नगर-नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

**३) ११ कि.मी.स्पर्धा -**

११ कि.मी.स्पर्धा ही रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होवून तिरूपती नगर- जकात नाका- बोळींज नाका- पाटील आळी- उमराळे चर्च- चक्रेश्वर तलाव येथून यु टर्न-उमराळे चर्च- पाटील आळी- बोळींज नाका- गोकुळ टाऊनशीप -मुलजीभाई मेहता स्कूल-राजीव चौकातुन उजवीकडे- विजय वल्लभ हॉस्पीटल-तिरूपती नगर- नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

**४) ५ कि.मी.स्पर्धा -**

५ कि.मी.स्पर्धा ही रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होवून तिरूपती नगर-जकातनाका- बोळींज नाका (व्दारका स्वीट) येथून यु टर्न- गोकुळ टाऊनशीप-मुलजीभाई मेहता स्कूल-राजीव चौकातुन उजवीकडे- विजय वल्लभ हॉस्पीटल-तिरूपती नगर- नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

**पालघर जिल्हा मर्यादित व शालेय गटातील स्पर्धा-**

**१) ११ कि.मी. स्पर्धा ( पालघर जिल्हा मर्यादीत ) -**

११ कि.मी.स्पर्धा (पालघर जिल्हा मर्यादीत) याचा रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होवून तिरूपती नगर- जकात नाका- बोळींज नाका- पाटील आळी- उमराळे चर्च- चक्रेश्वर तलाव येथून यु-टर्न-उमराळे चर्च- पाटील आळी- बोळींज नाका- गोकुळ टाऊनशीप -मुलजीभाई मेहता स्कूल-राजीव चौकातुन उजवीकडे- विजय वल्लभ हॉस्पीटल- तिरूपती नगर- नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

**२) ७ कि.मी. ( पालघर जिल्हा मर्यादित ) -**

७ कि.मी. शालेय स्पर्धा याचा रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होवून महिपाल मेडीकल- विजय वल्लभ हॉस्पीटल (तिरूपती नगर)- बंजारा हॉटेल – कॅनरा बँक- जुने विवा कॉलेज रोड- मॅक्डोनल्डस् – कॉसमॉस बँकेपासून उजवीकडे वळून समोरील सर्कलवरून डावीकडे टर्न- फॅन्टसी केक शॉपपासून डावीकडे-अव्हेन्यु आय समोरून जे.एन.बी.ट्रेडर्स पासून उजवीकडे- सिध्दीविनायक मंदीर- रूस्तमजी स्कूल – नारंगी बिट चौकी पासून यु टर्न-रूस्तमजी स्कूल- सिध्दीविनायक मंदीर-जेएनबी ट्रेडर्स पासून डावीकडे- फॅन्टसी केक- कॉसमॉस बँक-मॅक्डोनल्डस्-मनी गोपाळ बिल्डींगसमोरील बधाई स्वीट चौक पर्यंत असा असणार आहे.

**३) ५ कि.मी. (शालेय स्पर्धा ) -**

७ कि.मी. शालेय स्पर्धा याचा रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होवून महिपाल मेडीकल- विजय वल्लभ हॉस्पीटल (तिरूपती नगर)- बंजारा हॉटेल – कॅनरा बँक- जुने विवा कॉलेज रोड- मॅक्डोनल्डस् – कॉसमॉस बँकेपासून उजवीकडे वळून समोरील सर्कलवरून डावीकडे टर्न- फॅन्टसी केक शॉपपासून यु टर्न- कॉसमॉस बँक-मॅक्डोनल्डस् - आगरी चौक-मनी गोपाळ बिल्डींगसमोरील बधाई स्वीट चौक पर्यंत असा असणार आहे.

**४) ३ कि.मी. (शालेय स्पर्धा ) -**

७ कि.मी. शालेय स्पर्धा याचा रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होवून महिपाल मेडीकल- विजय वल्लभ हॉस्पीटल (तिरूपती नगर)- बंजारा हॉटेल – कॅनरा बँक- जुने विवा कॉलेज रोड- मॅक्डोनल्डस् पासून यु टर्न- आगरी चौक- मनी गोपाळ बिल्डींगसमोरील बधाई स्वीट चौक पर्यंत असा असणार आहे.

**५) २ कि.मी. (शालेय स्पर्धा ) -**

७ कि.मी. शालेय स्पर्धा याचा रूट नवीन विवा कॉलेज येथून सुरू होवून महिपाल मेडीकल- विजय वल्लभ हॉस्पीटल (तिरूपती नगर)- बंजारा हॉटेल – कॅनरा बँक- जुने विवा कॉलेज रोड- हॉटल हवेली पासून यु टर्न – मनी गोपाळ बिल्डींगसमोरील बधाई स्वीट चौक पर्यंत असा असणार आहे.

उपरोक्त नमुद मॅरेथॉन स्पर्धेच्या सर्व मार्गांवर दि.११/१२/२०२२ रोजी सकाळी ५:३० वा.ते १३:०० वाजेपावेतो सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. **वाहनचालक आणि नागरीकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी बंद मार्गाचे नजीकचे पर्यायी मार्गाचा वापर करून सहकार्य करावे.**

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही फायरब्रीगेड, रूग्णवाहीका, इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने, महसुल विभाग, पोलीस विभाग, तालुका दंडाधिकारी, वसई-विरार महानगरपालीकेची वाहने, मॅरेथॉन स्पर्धेकरिता परवानगी दिलेली वाहने यांना वगळून इतर सर्व वाहनांना लागू राहणार आहे.

----oooo----